# समिती दर्पण

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# अनिवासी भारतीयांबरोबर जुळली नाळ

**विद्यार्थी साहाय्यक समितीला परदेशातील देणगीदारांकडून देणग्या मिळत असल्या, तरी त्या परिचयातील किंवा समितीशी संबंधित व्यक्तींकडूनच येत होत्या. समितीच्या कार्याचा प्रसार परदेशात झाला नव्हता. परदेशस्थ भारतीयांना समितीच्या कामाची ओळख करून द्यावी, त्यांना या कामाशी जोडून घ्यावे, त्यांना मदतीसाठी आवाहन करावे, या उद्देशाने सन २०२३- २०२४ या वर्षात विशेष प्रयत्न केले गेले. त्यातून अनेक अनिवासी भारतीयांची समितीशी नाळ जोडली गेली. येत्या २७ ते ३० जून रोजी सॅन होजे येथे होणाऱ्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनामध्ये समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके व तुकाराम गायकवाड समितीचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या अधिवेशनात समितीचा स्टॉलही असेल. त्यानिमित्ताने गेल्या वर्षभरात समितीच्या कार्याचा परदेशात झालेल्या प्रसाराचा आणि देणगीदारांकडून मिळालेल्या प्रतिसादाचा आढावा...**

समितीच्या थिंक टॅंकच्या नियोजनाचा एक भाग म्हणून जागतिक स्तरावर समितीचे कार्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावे आणि मार्च २०२४ पर्यंत परदेशी देणगीदारांकडून किमान एक लाख अमेरिकी डॉलर एवढा निधी देणगी स्वरुपात मिळवावा, असे ध्येय निश्चित करण्यात आले. या नियोजनाचे पहिले पाऊल म्हणजे समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके आणि विश्वस्त तुकाराम गायकवाड यांचा जुलै २०२३ मधील अमेरिका दौरा.

एखादी संस्था जेव्हा विशिष्ट सामाजिक उद्देशाने प्रामाणिकपणे आणि पारदर्शी पद्धतीने काम करते, तेव्हा त्या संस्थेशी संबंधित घटक हेच त्या संस्थेचे समाजातील प्रतिबिंब असतात, याचा प्रत्यय विद्यार्थी साहाय्यक समितीला वेळोवेळी आला आहे आणि हाच अनुभव अमेरिका दौऱ्यात आला. २२ जुलै २०२३ ते २ ऑगस्ट २०२३ दरम्यान झालेल्या दौऱ्यात तुकाराम गायकवाड यांनी न्यूयॉर्क- न्यूजर्सी, शिकागो, ह्युस्टन, ऑस्टीन, डल्लास, सॅन होजे, सॅन फ्रान्सिस्को- कॅलिफोर्निया या शहरांमधील महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांच्या भेटी घेतल्या. या मंडळांची शिखर संस्था असलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बीएमएम) जुलै महिन्याच्या अंकात समितीविषयी लेख प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे समितीची तोंडओळख या सदस्यांना होती. त्यांना समितीच्या विविध उपक्रमांची माहिती दिल्यानंतर अनेकांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दर्शविली. शिकागोमध्ये राहणारी समितीची माजी विद्यार्थिनी योगिता येवले– कोठवदे हिच्या माध्यमातून शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाच्या माजी अध्यक्षा आणि विश्वस्त डॉ. उल्का नगरकर, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या माजी अध्यक्षा व विश्वस्त डॉ. विद्या जोशी, श्रीकांत करमरकर, सविता करमरकर, डॉ. सिद्धेश शेवडे, अभिनय लबडे, सुचिता लबडे, विशाल काळे, मनीषा पंडित, सोनाली सावरकर, विद्या फुके, माधुरी गद्रे, विनया दांडेकर यांच्याशी समितीच्या कामाबाबत गप्पा झाल्या. प्रत्येकाने समाजमाध्यमाद्वारे समितीच्या कामाचा प्रसार करण्याचे मान्य केले. अमेरिकेत स्थायिक झालेल्या नगर जिल्ह्यातील सहाशेपेक्षा जास्त लोकांचा गट व्हॉटस् अप ग्रुपच्या माध्यमातून समाजोपयोगी कामे करत असतो. या गटातील विशाल काळे व त्यांचे सहकारी श्री. देसले, किशोर गोरे, ओंकार कलवडे यांनी नगरमध्ये होणाऱ्या वसतिगृहांसाठी मदतीचे आवाहन करणार असल्याचे सांगितले.

डल्लासमध्ये सेतू फाऊंडेशनच्या डॉ. मृणालिनी राडकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्र मंडळाच्या सदस्यांबरोबर बैठक झाली. तेथील चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी रंजन नाबर यांनी समितीने अमेरिकेत शिक्षणासाठी विद्यार्थी पाठवल्यास त्यांना संपूर्ण मदत करण्याचा मानस बोलून दाखवला. ह्युस्टनमधील अजित दिघे यांनी पालकत्व योजनेत सहभागी होण्याची तयारी दाखविली. ऑस्टीनमधील साईबाबा मंदिराचे विश्वस्त, समितीचे नियमित सहाय्यदाते प्रकाश तेंडोलकर यांची भेट झाली.

### सीओईपी माजी विद्यार्थी संमेलनाला उपस्थिती

पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीओईपी) सॅन होजे येथील माजी विद्यार्थी संमेलनात उपस्थित राहून समितीची माहिती देण्याची संधी तुकाराम गायकवाड व डॉ. फडके यांना मिळाली.

न्यू जर्सीमध्ये महाराष्ट्र मंडळाचे विलास आणि शुभदा सावरगावकर या दांपत्यासह महाराष्ट्र फाउंडेशनचे राजीव भालेराव, डॉ. अनिल नेरूरकर, श्री. पाटणकर यांच्याबरोबर चर्चा झाली. मिशिगनचे खासदार श्री ठाणेदार यांचीही भेट झाली. त्यांनीही समितीत येण्याचे आश्वासन दिले.

### अमेरिकेतील संस्थांबरोबर धोरणात्मक युती

अमेरिकेतील अशा काही स्वयंसेवी संस्थांबरोबर समितीने करार केले आहेत, ज्या भारतातील संस्थांच्या वतीने देणगी गोळा करतात. अनिवासी भारतीय देणगीदार यापैकी कोणत्याही संस्थेला त्यांच्या देणग्या पाठवू शकतात. त्या संस्थांमार्फत ती देणगी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळू शकते. त्यामध्ये न्यूयॉर्कमधील महाराष्ट्र फाऊंडेशन, आयडीआरएफ (वॉशिंग्टन), इंडियन्स फॉर कलेक्टिव्ह ॲक्शन, बे एरिया आणि बेनिव्हिटी यांचा समावेश आहे. या प्रयत्नांना खूप चांगले यश मिळाले. समितीला मिळालेल्या देणग्यांपैकी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त देणग्या या स्वयंसेवी संस्थांमार्फत आल्या आहेत.



कॅलिफोर्निया बे एरिया येथे झालेल्या गर्जे मराठी संस्थेच्या जागतिक परिषदेत उपस्थित अमेरिकेतील उद्योजकांसह तुकाराम गायकवाड.

## 'गर्जे मराठी'च्या जागतिक परिषदेत सहभाग

समितीचा गेल्यावर्षी अमेरिकेतील गर्जे मराठी या संस्थेबरोबर सामंजस्य करार झाला आहे. या संस्थेच्या माध्यमातून समितीतील विद्यार्थ्यांसाठी उद्योजकता विकास कार्यक्रम राबविला जातो. २९ आणि ३० जुलै २०२३ रोजी कॅलिफोर्निया बे एरिया येथे झालेल्या गर्जे मराठीच्या जागतिक परिषदेमध्ये विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी समितीचे प्रतिनिधित्व केले.

या परिषदेला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार व विश्वस्त डॉ. मकरंद फडके हेही उपस्थित होते. परिषदेत समितीच्या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. समितीला या परिषदेमध्ये बूथ मिळाला होता. त्यासाठी समितीचे अमेरिकेतील मित्र राहुल फडतरे, अमेय मराठे, अंजलीताई अंतुरकर यांनी खूप मदत केली. या परिषदेत ७५० हून अधिक मराठी उद्योजकांचा सहभाग होता.



दुबईत झालेल्या परिषदेत समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्यासह समितीमित्र.



शिकागोस्थित महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह तुकाराम गायकवाड.

### ॲन आर्बरमधील परिषदेत समितीला संधी

अमेरिकेतील ॲन आर्बर शहरात २८ एप्रिलला झालेल्या ॲन आर्बर मराठी मंडळाच्या परिषदेत विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाची ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली. परिषदेला मंडळाचे चारशेहून अधिक सदस्य उपस्थित होते. समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांनी उपस्थितांना समितीची कमवा आणि शिका योजना (सोशल मीडिया सपोर्ट प्रोजेक्ट) आणि सामाजिक जाणीव संकल्पाविषयी माहिती दिली.

तेथील समितीच्या स्टॉलला अनेकांनी भेट दिली. समितीच्या कामाला पाठिंबा देत सहभागाची इच्छा व्यक्त केली. यासाठी राजीव कुलकर्णी आणि ॲन आर्बर मराठी मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ शेंडे यांचे सहकार्य लाभले.

### ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडसाठी ऑनलाईन चर्चासत्र

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील अनिवासी भारतीयांना समितीच्या कार्याची माहिती देण्यासाठी एप्रिलमध्ये समितीच्या कार्यकर्त्या सुप्रियाताई केळवकर आणि समिती मित्र नितीन नाईक यांच्या सहकार्याने ऑनलाइन चर्चासत्र आयोजित केले होते.

### फिलाडेल्फिया मराठी मंडळाबरोबर संवाद

फिलाडेल्फिया मराठी मंडळाचे अध्यक्ष सचिन प्रभुदेसाई आणि उपाध्यक्ष सुचित्रा शिंदे यांच्या सहकार्याने मंडळाच्या सदस्यांबरोबर ऑनलाइन बैठक झाली. फिलाडेल्फिया परिसरातील अनेकांनी त्यात सहभाग घेत समितीला पाठबळ देण्याची इच्छा व्यक्त केली.



श्री. पाटणकर, डॉ. अनिल नेरूरकर आणि राजीव भालेराव यांच्यासमवेत.

### दुबईत महाराष्ट्र बिझनेस फोरमचा कार्यक्रम

दुबई येथे महाराष्ट्र बिझनेस फोरमने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये सहभाग घेण्याची संधी समितीला मिळाली. त्यामुळे समितीला मध्य पूर्व आणि आफ्रिकेतील मराठी माणसांपर्यंत पोचण्यास मदत झाली. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्यासह तुकाराम गायकवाड या कार्यक्रमाला उपस्थित होते.

### मराठी विश्व टीमसमोर सादरीकरण

मराठी विश्व टीमच्या वार्षिक सहली दरम्यान समितीच्या उपक्रमांचे सादरीकरण करण्याची संधी विश्वस्त डॉ. मकरंद फडके आणि सौ. योगश्री फडके यांना मिळाली. टीमच्या सौ. रुपाली गुणे, सौ. कांचन जोशी यांनी त्यासाठी सहकार्य केले. या सहलीत सुमारे १२५ जण सहभागी झाले होते.

# अनिवासी भारतीयांचा शाश्वत आधार




*परदेशस्थ समितीमित्रांशी संवाद साधताना समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार.*

अमेरिका दौऱ्यामुळे तेथील अनेक मराठी व्यक्तींमध्ये समितीविषयी कुतुहल निर्माण झाले आहे. त्यामुळेच सध्या अमेरिकेत वास्तव्य असलेले अजित दिघे, डॉ. चंद्रशेखर केळकर, श्री. व सौ. कुर्लेकर, विनायक केळकर यांनी सप्टेंबरमध्ये भारतात येताच आवर्जून समितीच्या वसतिगृहांना भेट दिली. समितीच्या कामाविषयी माहिती मिळाली होतीच, पण त्याहीपेक्षा कितीतरी पटीने चांगले काम येथे होत असल्याची प्रतिक्रिया या पाहुण्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर समितीच्या उपक्रमांना सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले. सीओईपीच्या माजी विद्यार्थी संमेलनादरम्यान तुकाराम गायकवाड यांनी कॉलेजचे माजी विद्यार्थी, अमेरिकास्थित उद्योजक आशिष अचलेरकर यांची भेट घेतली होती. समितीविषयी माहिती ऐकून प्रभावित झालेले अचलेरकर भारतात येताच समितीत आले. समितीच्या सर्व वसतिगृहांची त्यांनी पाहणी केली. समितीच्या कामकाजाची बारकाईने माहिती घेतली. व्यग्र दिनक्रम असतानाही सुमारे साडेतीन तास त्यांनी समितीत व्यतित केले. अपेक्षेपेक्षा चांगले काम पाहायला मिळाले, अशी प्रतिक्रिया त्यांनी विश्वस्तांशी बोलताना व्यक्त केली.

मिशिगनस्थित राजीव कुलकर्णी हे समितीचे माजी कार्यकारी विश्वस्त यादवराव कुलकर्णी यांचे नातू. त्यांनीही भारतात येताच समितीला भेट दिली. समितीच्या कामात सहभागी होण्याचा, समितीच्या पाच मुलामुलींचे पालकत्व घेण्याचा व वसतिगृहाच्या बांधकामासाठी आर्थिक मदत देण्याचा विचार बोलून दाखवला. राजीव भालेराव, अमेय मराठे, श्री. व सौ. गोगटे, अनिल नेरुरकर, विवेक पाटणकर या अनिवासी भारतीयांनीही समितीला भेट दिली. या पाहुण्यांच्या भेटीदरम्यान झालेल्या बैठकांना समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. अगदी आयत्या वेळी सांगूनही या बैठकांना कार्यकर्ते आवर्जून उपस्थित राहतात, याचे अनेक पाहुण्यांनीही कौतुक केले. कार्यकर्त्यांच्या समर्पित वृत्तीचा विशेष उल्लेखही केला.

## अमेरिकेतील मराठी बांधवांपर्यंत पोचले काम

गेल्या वर्षी 'गर्जे मराठी'च्या अधिवेशनात समितीला सहभागाची संधी मिळाली. त्यावेळी अनेक मराठी बांधवांना समितीचे कार्य पहिल्यांदा समजले. पुण्यासारख्या शहरात इतकी वर्षे आणि निःस्पृह भावनेने चाललेल्या कामाबद्दल ऐकून अनेकांना आश्चर्य वाटले. यापैकी भारतात आल्यावर अनेकांनी समितीला आवर्जून भेट दिली. प्रत्यक्ष कार्य पाहून अनेक जण भारावून गेले. त्यातून समितीला भरभरून आर्थिक मदत ही मिळाली. समिती मित्र संकल्पनेअंतर्गत अमेरिकेच्या वेगवेगळ्या प्रांतामध्ये काहींनी कामाची तयारी ही दाखवली. काही संस्थांनी कमवा शिका योजनेअंतर्गत समितीच्या मुलांना सोशल मीडिया, डिजिटल स्वरूपाची ऑनलाईन कामे उपलब्ध करून दिली. गर्जे मराठी, महाराष्ट्र फाउंडेशन, पालव, ॲन आर्बर मराठी मंडळ अशा संस्थांबरोबर सामंजस्य करार होऊन त्या समितीशी जोडल्या गेल्या. त्यामुळे यावर्षी होणाऱ्या अधिवेशनात समितीचा सहभाग असावा असा आग्रह झाला आणि सहभाग निश्चित केला.

### काही शहरांनाही भेटी

समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांनी पाठपुरावा करत नियोजन करत अनेकांशी संपर्क वाढवून समिती कार्य तेथे पोहोचवले आहे. ते सध्या अमेरिकेतच आहेत. विश्वस्त तुकाराम गायकवाड यांचा २१ जून ते ४ जुलै असा अमेरिका दौरा आहे. अधिवेशनाबरोबरच हे दोघे काही शहरांना भेटी देऊन मराठी बांधवांना समितीची माहिती देणार आहेत. या कामी समितीच्या अमेरिकेतील हितचिंतकांचा मोठा सहभाग आहे.

### भेटीचा कार्यक्रम -

२१ जून- शिकागो (राम केळकर), २२ जून- सिनसिनाटी (शार्दूल चिरपुटकर), २३ जून- ॲन आर्बर- डेट्रॉईट (राजीव कुलकर्णी), २४ जून- अटलांटा (जयंत उमराणी).

### साडेचार कोटींच्या देणग्या

गेल्या दीड वर्षात परदेशातील देणगीदारांकडून समितीला पाच लाख ४६ हजार अमेरिकी डॉलर (USD) म्हणजेच चार कोटी ४८ लाख रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत, तर एक लाख डॉलरहून (USD) अधिक देणग्यांचे आश्वासन मिळाले आहे. मिळालेल्या देणग्यांमध्ये श्री. आणि सौ. शेंदुरे, श्री. आणि सौ. गोगटे, तसेच शेणॉय दांपत्य यांचे योगदान मोठे आहे. यांच्याकडून मिळालेल्या मोठ्या देणग्यांव्यतिरिक्त, पन्नासहून जास्त देणगीदारांनी सुमारे १७ हजार डॉलरचे (USD) योगदान दिले आहे. आर्थिक मदतीबरोबरच, अनेक जण समितीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत, त्यांच्यातील कौशल्ये विकसित करण्याकरता मदत करत आहेत. ऑस्टिन येथील श्री. तेंडोलकर यांनी विद्यार्थ्यांचे वैयक्तिक माहिती (Resume) लेखनाचे कौशल्य सुधारण्यासाठी ऑनलाइन वर्ग आयोजित केले. मीनल रेणावीकर विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान विषयात मदत करत आहेत. गर्जे मराठीच्या स्वयंसेवकांनी या विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची ठिणगी पेटवण्यास मदत केली आहे.

### परदेशस्थ समितीमित्रांचा मेळावा

अनेक परदेशस्थ भारतीय डिसेंबरमध्ये सुटी घेऊन भारतात कुटुंबीयांच्या भेटीसाठी येतात. त्यांना एकत्रितपणे समितीत बोलावून समितीच्या विविध उपक्रमांची माहिती देण्याच्या उद्देशाने १९ डिसेंबरला प्रवासी भारतीय दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने आपटे वसतिगृहात परदेशस्थ समितीमित्रांना मेळावा रंगला. या कार्यक्रमात विविध देशांमध्ये सध्या वास्तव्य असलेले हिमांशू भट, मीनल रेणावीकर, अमित केळवकर, केतन खंडकर, शिरीष खंडकर, रश्मी बडवे, नेहा खंडकर, दीपाली कुलकर्णी आदी सहभागी झाले होते.

### विविध देशांमध्ये समितीचे सदिच्छादूत

अनिवासी भारतीयांमध्ये संपर्क वाढविण्यासाठी समिती मित्र संकल्पना राबविण्यात येत आहे. या समिती मित्रांनी त्यांच्या देशात, त्यांच्या समाजात समितीचे सदिच्छादूत (अम्बॅसेडर) म्हणून काम करणे अपेक्षित आहे. आज अमेरिका, कॅनडा, दुबई, श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये मिळून पंधरा समिती मित्र आहेत, जे समितीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मदत करत आहेत.

## 'कमवा-शिका'साठी परदेशी संस्थांचे सहकार्य

कमवा- शिका योजनेचा आवाका वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना नवीन युगातील उद्योगांची ओळख करून देण्यासाठी, समितीने या योजनेचे जागतिकीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. याची सुरुवात जुलै २०२३ मध्ये गर्जे मराठी परिषदेच्या वेळी झाली. या परिषदेने जगभरातील मराठी माणसांना एकत्र आणले. सोशलमीडियाद्वारे या सर्वांना एकत्र आणण्याचे आणि परिषदेची माहिती जगभर पोचविण्याचे काम समितीचा माजी विद्यार्थी ओंकार वाघमारे आणि त्याच्या नेतृत्वाखालील समितीतील विद्यार्थ्यांच्या टीमने कमवा व शिका योजनेअंतर्गत केले. त्यांचे गर्जे मराठी संस्थेतर्फे कौतुक करण्यात आले.

या यशानंतर बीएमएम २०२४, ॲन आर्बर मराठी मंडळ यांचीही डिजीटल सपोर्टची कामे या योजनेतून करण्यात आली. अशी आणखी कामेही मिळण्याच्या मार्गावर आहेत. अमेरिकेतील पालव व ॲन आर्बर मराठी मंडळ या दोन स्वयंसेवी संस्थांबरोबर सामंजस्य करार झाला आहे. पालव ही संस्था कमवा- शिका योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना सोशल मीडिया सपोर्टचे काम देणार आहे, ज्यात डिजीटल सपोर्ट, वेबसाईट डेव्हलपमेंट, कन्टिन्यूअस अपडेटिंग अशा कामांचा अंतर्भाव असेल. ॲन आर्बर मराठी मंडळ ही संस्था समितीच्या सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत जोडली जाणार आहे. सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम समितीतील विद्यार्थी करतात. या विद्यार्थ्यांना अनुभव मिळतो, शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक मदत मिळते, शिवाय पालिका शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते. यासाठी एटूएमएम ही संस्था सहकार्य करणार आहे. यातून साधारण १०० विद्यार्थ्यांना कमवा- शिका योजनेतून काम देण्याचे उद्दिष्ट आहे. ही कल्पना ॲन आर्बर मंडळाचे श्री. राजीव कुलकर्णी यांनी सुचविली. ती मंडळासमोर सादर करण्यात आली, तेव्हा या योजनेसाठी निधी देण्याची तयारी मंडळाने दाखविली. ही कल्पना ऑस्ट्रेलियातील अनिवासी भारतीयांबरोबर झालेल्या ऑनलाइन बैठकीतही मांडण्यात आली.



*शेंदुरे परिवार*



*समिती भेटीदरम्यान राजीव भालेराव*



*आशिष अचलेरकर यांच्यासह तुकाराम गायकवाड, डॉ. मकरंद फडके*

## फेसबुक पोस्टवरून जुळले शेणॉय दांपत्याशी नाते

### सुमारे १ कोटी रुपयांची देणगी

अमेरिकास्थित सुनील आणि साधना शेणॉय या दांपत्याने जून महिन्यात समितीला १ लाख १५ हजार डॉलर (₹ ९५ लाख २५ हजार) देणगी दिली. गेल्या वर्षी त्यांनी ६२०० डॉलर समितीच्या खात्यात जमा केले होते.

शेणॉय कुटुंबीय हे समितीचे विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांचे मित्र आहेत. डॉ. फडके यांच्या फेसबुक पोस्टवरून त्यांना समितीच्या कार्याविषयी माहिती मिळाली. त्या पोस्टला प्रतिसाद म्हणून त्यांनी प्रथम ६२०० डॉलर पाठवले. गेल्या जानेवारीत शेणॉय कुटुंबीयांनी समितीला, मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या बांधकामाला भेट दिली. त्यावेळी समितीचे माजी विद्यार्थी तुकाराम गायकवाड व चंद्रकांत कुलकर्णी यांनी समिती कार्याची माहिती दिली. समितीचे सेवाभावी काम पाहून ते प्रभावित झाले व आणखी १ लाख डॉलर देण्याचा मानस व्यक्त केला. प्रत्यक्षात त्यांनी १ लाख १५ हजार डॉलर पाठवले.



*समितीत शेणॉय परिवाराचे स्वागत करताना विश्वस्त तुकाराम गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी.*

# नगरला मुलींच्या वसतिगृहाचे ७ जुलैला उद्घाटन



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पुण्याबाहेरील पहिल्या वसतिगृहाचे उद्घाटन रविवार, ता. ७ जुलै रोजी नगर येथे होत आहे.

परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशनच्या देणगीतून उभारलेल्या या वसतिगृहाचे उद्घाटन डॉ. प्रमोद चौधरी व सौ. परिमल चौधरी यांच्या हस्ते होणार आहे. या वसतिगृहात ६० विद्यार्थिनींची सोय होणार आहे.

### आणखी दोन प्रकल्प अंतिम टप्प्यात

ग्रामीण भागातून शहरात येऊन उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. समितीत मुलींना मिळणारी सुरक्षितता, सुविधा व संस्कार यामुळे समितीत प्रवेश मिळाला, तरच शहरात शिक्षणासाठी पाठवणार, अशी पालकांची मानसिकता असते. हे लक्षात घेऊन समितीने तीन नवीन प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यापैकी पुण्यात एक आणि नगरमध्ये एक वसतिगृह मुलींसाठी होत आहे. पुण्यातील मुलींच्या वसतिगृहाचे काम अंतिम टप्प्यात असून तेथे ३३६ मुलींची सोय होणार आहे. नगरमध्येच १२० मुलांसाठीच्या वसतिगृहाचे कामही पूर्ण होत आले आहे. अशा रीतीने सन २०२४- २५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी क्षमता सुमारे ५०० ने वाढत आहे. समितीची एकंदरीत विद्यार्थी संख्या नजीकच्या भविष्यकाळात सुमारे १२५० होत आहे.

### निधी संकलनाचे आव्हान

पुण्यातील मुलींच्या नियोजित वसतिगृहाचा अपेक्षित खर्च अंदाजे ३२ कोटी रुपये आहे. त्यात समाजातील दानशूर व्यक्तींचा लक्षणीय सहभाग असला, तरीही उर्वरित १७ कोटी रुपयांचे निधी संकलन हे आव्हानात्मक आहे. आपण समितीला वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक किंवा उपयुक्त वस्तूंसाठी मदत करू शकता. तसेच प्रकल्पातील निरनिराळ्या विभागांचे प्रायोजकत्व घेऊ शकता. आपण आपल्या परिचित दानशूर व्यक्तींनाही समितीच्या कामाशी जोडू शकता.

### निरंतर स्मृती योजना


समितीच्या पुण्यात उभारण्यात येत असलेल्या मुलींसाठीच्या वसतिगृहातील सुसज्ज व स्वयंपूर्ण खोलीला आपल्या कुटुंबीयाचे किंवा प्रियजनाचे नाव आपण देऊ शकता. त्यासाठी दहा लाख रुपये असे संकल्पित मूल्य ठेवण्यात आले आहे. ते आपण वैयक्तिकरित्या, कौटुंबिक किंवा मित्रमंडळींच्या समुहातर्फे देऊ शकता.




# सुदृढ, निरोगी भावी पिढीसाठी

**डॉ. अभय व्यवहारे**

विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये आरोग्य केंद्राची सुरुवात सर्वप्रथम डॉ. आपटे वसतिगृहामध्ये ७ सप्टेंबर १९८० रोजी झाली. त्यानंतर लजपत भवनमध्ये सन १९८९, तर सुमित्रा सदनमध्ये सन १९९१ मध्ये आरोग्य केंद्राचे काम सुरू झाले. सध्या समितीच्या पाचही वसतिगृहांमधील एकूण ७५० विद्यार्थी आरोग्य केंद्राचा लाभ घेत आहेत. दोन वैद्यकीय अधिकारी या आरोग्य केंद्राचे काम पाहात आहेत.



समितीत मुलांचा प्रथम प्रवेश झाल्यावर आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य तपासणी करणे सक्तीचे आहे. सर्व मुलांची साधारणतः पहिल्या सत्रामध्ये आरोग्य तपासणी केली जाते. यात पुढील गोष्टींची तपासणी होते,

१. वजन- उंची आणि बीएमआय २. हिमोग्लोबिन ३. त्वचा ४. दात, डोळे, कान

आरोग्य तपासणी करताना काही आजार किंवा कमतरता आढळल्यास त्यानुसार औषधे, आहार आणि विहार यांचे मार्गदर्शन केले जाते. भोजनालयामध्ये मुलांना चौरस आहार दिला जातो. मुलांनी बाहेरचे अन्नपदार्थ खाऊ नये, याबद्दल त्यांना सूचना दिल्या जातात आणि त्याचे महत्त्व सांगितले जाते.

### आजाराची शंका आल्यास पाठपुरावा

गेल्या वर्षी एकूण ७५४ विद्यार्थी/ विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी झाली आहे. आरोग्य तपासणी करताना काही विशेष आढळल्यास त्याला किंवा तिला तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठवले जाते. पालकांना त्याबद्दल कळवले जाते आणि त्याचा पाठपुरावा केला जातो. जसे की, यावर्षी एका मुलांमध्ये हृदयविकाराची शंका आल्याने त्याला तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठवून त्याच्या पालकांना वैयक्तिक कळवले गेले. त्याच्यावर आता व्यवस्थित उपचार सुरू झाले आहेत.

### व्याख्याने, शिबिरांचे आयोजन

प्रत्येक सत्रामध्ये आरोग्यविषयक आणि वैयक्तिक स्वच्छतेविषयी मुलांना व्याख्यान दिले जाते. या विषयावर तज्ज्ञांची व्याख्यानेही आयोजित केली जातात. निरनिराळी आरोग्य शिबिरे, यात दात, डोळ्यांसाठीही शिबिरे आयोजित केली जातात. रक्तदान शिबिर भरवले जाते.

### तज्ज्ञांकडून समुपदेशन

किरकोळ आजारांवर आरोग्य केंद्रामध्येच औषधे देऊन उपचार केले जातात. मुलांचे मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी तज्ज्ञ व्यक्तींकडून समुपदेशन केले जाते. मानसिक ताण अधिक असल्यास मानसोपचार तज्ज्ञाची मदत घेतली जाते.

### व्यायामाची साधने, योगासन वर्ग

मुलामुलींच्या शारीरिक आरोग्यासाठी वसतिगृहातच व्यायामाची साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत, ज्यांचा मुले भरपूर फायदा घेतात. मुलांना योगासनाचे महत्त्व सांगून दररोज अर्धा तास त्यांना ती शिकवली जातात आणि करवून घेतली जातात.

# कार्यकर्त्यांच्या कार्यशाळेत उद्दिष्टांबाबत विचारमंथन

समितीच्या कार्यकर्त्यांची यावर्षीची कार्यशाळा ८ जून रोजी शिवापूर येथे जे. पी. नाईक ग्रामीण महिला विकासिनी संस्थेत झाली. त्यात १७ कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत सुरुवातीला समितीने थिंक टँकमध्ये ठरविलेली उद्दिष्ट्ये आणि त्यातील या शैक्षणिक वर्षात पूर्ण करावयाची उद्दिष्ट्ये या अनुषंगाने विचारमंथन झाले. उपाययोजना व जबाबदारी निश्चित करण्याबाबत चर्चा झाली. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी हा विषय मांडला. दुपारच्या सत्रात इंटर्नशिप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आणि प्लेसमेंट सेल या अनुषंगाने विश्वस्त तुकाराम गायकवाड, डॉ. ज्योती गोगटे यांनी माहिती सांगितली. या वर्षात त्यासाठी कसे प्रयत्न करावे लागतील, याबाबत कल्पना दिली. नगर येथील वसतिगृह प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रभाकर पाटील यांनी माहिती दिली. तेथील आव्हाने आणि उपाययोजना याविषयी उपस्थितांनी मते मांडली. येत्या ७ जुलैला मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन होणार असल्याने त्या दृष्टीने नियोजनावर चर्चा झाली.




# विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाचे धडे; दोन दिवसांचे शिबिर, २०० जणांचा सहभाग



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहांतील बहुतांश व्यवस्थापन हे विद्यार्थ्यांकडूनच केले जाते. येत्या शैक्षणिक वर्षासाठी या व्यवस्थापनाचे धडे देण्याकरता शिबिराचे आयोजन केले होते. यात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दोन दिवसांच्या या शिबिरात समितीची ध्येयधोरणे, समिती व्यवस्थापन, पाल्य-पालक योजना, कमवा- शिका योजना, टीमवर्क याविषयी सुप्रिया केळवकर, तुकाराम गायकवाड, मनीषा गोसावी, हेमंत राजहंस यांनी माहिती दिली. प्रणय पाले यांनी खेळांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. रत्नाकर मते यांनी काही ॲक्टिव्हिटींच्या माध्यमातून टीमवर्क आणि टीम बिल्डिंग याविषयी माहिती दिली. डॉ. भूषण केळकर यांनी करिअर मॅनेजमेंट, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे महत्त्व सांगितले. आपणही डिजिटल भारताचा भाग होणे गरजेचे आहे, हे संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी समजावून सांगितले.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थी विकास केंद्राच्या कामाची माहिती देण्यात आली. शिवाय चार तास काम, योगासने, अवलोकन कार्ड भरण्याची पद्धत याबाबत ज्ञानेश्वर गटकळ, डॉ. अभय व्यवहारे, हरीश अष्टेकर, प्रभाकर पाटील यांनी सांगितले. व्यवस्थापनामध्ये काम केलेले माजी विद्यार्थी ओंकार वाघमारे, सुरेश उमाप यांनी अनुभव सांगितले. त्यानंतर गटचर्चा, पीपीटी प्रेझेंटेशन, चित्रफितीद्वारे व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि समारोप कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी केला. शिबिराला सर्व पर्यवेक्षक, कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन जीवन बोधले यांनी केले तर समिती समन्वयक कुंदन पठारे यांनी आभार मानले.